## * स्पर्धेची वैशिष्टये *

- गुणानुक्रमे श्रेष्ठ ठरणाऱ्या संघास फिरता पद्मश्री विखे पाटील रौप्य करंडक आणि २१००/- रु. रोख व प्रशस्तीपत्र देण्यात येईल.
- गुणानुक्रमे श्रेष्ठ ठरणाऱ्या वरिष्ठ गटातील पहिल्या तीन क्रमांकाच्या स्पर्धकांना अनुक्रमे ७१०१/- रु., ५१०१/- रु., ३१०१/- रु., उत्तेजनार्थ १५०१/- रु. रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देण्यात येईल.
- कनिष्ठ महाविद्यालय गटातील गुणानुक्रमे श्रेष्ठ ठरणाऱ्या पहिल्या तीन क्रमांकाच्या स्पर्धकांना अनुक्रमे २५०१/- रु., २१०१/- रु., १५०१/- रु., उत्तेजनार्थ ७०१/- रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देण्यात येईल.
- गुणानुक्रमे पहिल्या दहा संघांना एका बाजूचा एस.टी./रेल्वे प्रवास खर्च देण्यात येईल.
- सर्व स्पर्धकांची भोजन व निवास व्यवस्था मोफत करण्यात येईल.
- विजेत्या स्पर्धकांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल.

**सहभागी स्पर्धकांना दि.३० जानेवारी २०२४ रोजी सायं. ५.३० नंतर महाविद्यालयाच्या बसने शिर्डी येथे साई दर्शनाची व्यवस्था केलेली आहे.**

प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख
**सोमवार २९ जानेवारी २०२४**

स्पर्धा तारीख
**मंगळवार ३० व बुधवार ३१ जानेवारी २०२४**

**उद्घाटन समारंभ**
**मंगळवार ३० जानेवारी २०२४**
सकाळी १०.०० वा.

**पारितोषिक वितरण समारंभ**
**बुधवार ३१ जानेवारी २०२४**
दुपारी ३.०० वा.

अधिक माहितीसाठी संपर्क
**Website :** www.pravarapvpcollege.org.in
Email : pvpcollege@gmail.com

*** स्पर्धेचे ठिकाण ***
**खासदार श्री. बाळासाहेब विखे पाटील बहुउद्देशीय सभागृह, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर.**





लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पाटील
(पद्मभूषण उपाधिने सन्मानित)
प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे

**पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय प्रवरानगर**

* द्वारा आयोजित *

## सहकार महर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन

# रौप्य करंडक वादविवाद स्पर्धा

सन २०२३-२४ (वर्ष ४२ वे)

मंगळवार ३० व बुधवार दि. ३१ जानेवारी २०२४



* वादविवादाचा प्रस्ताव *

**G 20 च्या अध्यक्षपदामुळे देशाची जागतिक महासत्तेकडे वाटचाल सुरु झाली !**

लोणी खुर्द,ता.राहाता,जि.अ.नगर • फोन (०२४२२) २७३४२५ • फॅक्स २७३४२६

मा.प्राचार्य, स.न.वि.वि.

सहकार महर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन रौप्यकरंडक वादविवाद स्पर्धा ही पद्मश्रींच्या उत्तुंग कर्तृत्वाची स्मृती म्हणून महाराष्ट्रात ओळखली जाते . गेल्या ४१ वर्षांपासून तत्कालीन सामाजिक, आर्थिक व राजकीय अशा विविध क्षेत्रातील ज्वलंत विषयांवर विचारमंथन घडवून आणण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वैचारिक व्यासपीठ उपलब्ध व्हावे व त्यांच्यातील सुप्त वक्तृत्व गुणांना चालना मिळावी या हेतूने ही स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाते .

१६ व्या शतकातील औद्योगिक क्रांतीतून जागतिक वसाहतवादाची बिजे रोवली गेली. या वसाहतवादातूनच जगामध्ये महायुद्धे झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जग प्रामुख्याने दोन विचार प्रवाहांमध्ये विभागले गेले. ते एक भांडवलशाही राज्यव्यवस्था आणि दुसरे समाजवादी राज्यव्यवस्था यात. त्यात अमेरिकेने भांडवलशाहीचे नेतृत्व स्वीकारले, तर रशियाने समाजवादाचे. अशा पार्श्वभूमीवर भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी या दोन्ही व्यवस्थामधील उणिवांचा विचार करून पंडित नेहरूंनी मिश्र अर्थव्यवस्थेच्या रचनेचा निर्णय घेतला. यातून भारताने तिसऱ्या जगाचे नेतृत्व आपल्याकडे घेतले. वाढत चाललेली लोकसंख्या, अपुऱ्या पायाभूत व्यवस्था, शिक्षणाचा अभाव, कमालीचे दारिद्र्य अशा प्रतिकूल परिस्थितीत केवळ एकाच मार्गावरून जाणे तसे अवघड होते. देशाचा विकासही घडवायचा होता आणि गरीबी हटवायची होती. त्याचबरोबर विकासाच्या मुख्य प्रवाहातही देशाला आणायचे होते. अशावेळी विकासाबरोबर कल्याणकारी धोरणांची अंमलबजावणी करणेही आवश्यक होते. हा प्रवास पुढे पन्नास वर्षे चालू राहिला. तरी आपल्याला अपेक्षित यश मिळाले नाही. रशियाचे विघटन झाल्यामुळे भांडवलशाहीचा प्रभाव वाढू लागला. त्याचवेळी भारतीय अर्थव्यवस्थाही मोडकळीला आली होती. त्यातून बाहेर पडण्यासाठी नरसिंहराव सरकारने खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. या काळात देश चालवण्याबरोबरच देशातील गरिबी हटवण्यासाठी वेगळ्या मार्गाचा अवलंब करणे आवश्यक झाले होते. अशावेळी भारतालाही भांडवलशाहीच्या दिशेने जाण्याशिवाय पर्याय राहिला नाही.

संगणक क्रांतीनंतर भारतीय तरुणांनी या क्षेत्रात स्वतःचे वर्चस्व निर्माण केले. जागतिकीकरणातून उपलब्ध झालेल्या विविध संधीतून भारतीयांनी विकासाची वाट अधिक प्रशस्त केली. जागतिकीकरणामध्ये बाजारपेठेला अत्यंत महत्त्व असते. त्यामुळे वाढती जी लोकसंख्या नियंत्रित व्यवस्थेत समस्या होती ती जागतिकीकरणाच्या व्यवस्थेत मात्र बलस्थान ठरली. भारत त्या दृष्टीने जगासाठी सर्वात महत्त्वाचे बाजारपेठेचे केंद्र ठरले. ज्या देशाकडे जग दुर्लक्ष करीत होते, त्याच देशांना भारत ही एक मोठी बाजारपेठ आहे याची प्रकर्षाने जाणीव झाली. भारताने हाच मुद्दा विचारात घेऊन जगाबरोबर संवादाची प्रक्रिया सुरु केली. एका बाजूला विकसित होणारे विज्ञान-तंत्रज्ञान, त्यावर मिळवलेली हुकूमत आणि सर्वात मोठी बाजारपेठ हे भारताचे २१व्या शतकामध्ये गुणात्मक बिंदू ठरले. याच पार्श्वभूमीवर जगातील प्रमुख विकसित देशांना आपापल्या देशांच्या विकासाची गती कायम ठेवण्यासाठी भारताला या प्रक्रियेत सामावून घेण्याशिवाय पर्याय राहिला नाही. या जागतिक राजकारणाची अपरिहार्य परिणती म्हणजे भारताचा G-20 मध्ये समावेश होणे. त्यातच मोदी सरकारच्या काळात भारताकडे अध्यक्ष पदाची जबाबदारी आली. भारतानेही या अध्यक्षपदाकडे अभूतपूर्व संधी म्हणून पाहिले. या निमित्ताने देशाच्या विविध भागात अनेक बैठका घेऊन, भारताच्या बाजारपेठेची क्षमता अधिक जोमदारपणे जगासमोर आणली. भारताची विविधता, बहुआयामी क्षमता, भारतीय तरुणांची बौद्धिक क्षमता, भारतीयांची परिश्रम क्षमता, अनुकूल निसर्ग, भूमी आणि वातावरण, याबरोबरच आपल्या विविध मूलभूत सुप्त क्षमता जगासमोर आणण्याची भारताला उत्तम संधी प्राप्त झाली. त्यामुळे भारताचा विकासरथ आता कोणीही थांबवू शकत नाही असा जागतिक विचार प्रवाह रूढ झाला. या परिषदेच्या निमित्ताने भारताने जागतिक महासत्ता होण्याकडे मार्गक्रमण सुरू केले असा भारतीयांनाही विश्वास वाटू लागला.

तरीही या संधीकडे सर्व भारतीयांनी अभूतपूर्व संधी म्हणून पाहिले तरच या विकास प्रक्रियेला खऱ्या अर्थाने गतिमान करता येणार आहे. कारण भारतातील आपमतलबी राजकारण, प्रादेशिक वाद, भाषिक अस्मिता, जातीयता, धर्मांधता, आतंकवाद, मूलतत्त्ववाद या आणि अशा अनेक समस्यांना आपण अजूनही पराभूत करू शकलो नाही. अशा परिस्थितीत १४० कोटी जनतेला एका समान उद्दिष्टांसाठी प्रेरित करणे शक्य आहे का? त्याचवेळी चीन-अमेरिका या देशांची जागतिक राजकारणातील दादागिरी, मुत्सद्देगिरी, आंतरराष्ट्रीय राजकारण या प्रभावांना आपण मर्यादित करू शकू का? असे प्रश्न समोर असताना G-20 चे यजमानपद मिळाले आणि विकसित भारत घडविण्याची संधी उपलब्ध झाली, तरी त्या संधीचे सोने करण्यात आपण यशस्वी होऊ का? आणि आपण भारताला विकसित राष्ट्र घडवू शकतो का? हा प्रश्न आहेच. या संदर्भात सर्वांगीण चर्चा घडवून आणण्यासाठी आम्ही आपल्यासमोर.

## G 20 च्या अध्यक्षपदामुळे देशाची जागतिक महासत्तेकडे वाटचाल सुरु झाली !

हा प्रस्ताव वादविवादासाठी ठेवत आहोत.

महाविद्यालयीन युवकांना वादविवाद स्पर्धेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. तरी कृपया आपल्या महाविद्यालयाचा संघ पाठवून आम्हांस सहकार्य करावे.

## ❊ स्पर्धेचे नियम व अटी ❊

१) महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयातील कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेमध्ये सहभागी होता येईल.

२) या स्पर्धेतील सर्व भाषणे मराठी भाषेतून होतील.

३) स्पर्धेतील स्पर्धकांना आपली बाजू मांडण्यासाठी ६+२=८ मिनिटे वेळ राहील.

४) बाहेर गावावरुन येणाऱ्या स्पर्धकांसाठी भोजन व निवास व्यवस्था मोफत करण्यात येईल.

५) प्रत्येक महाविद्यालयातून कनिष्ठ व वरिष्ठ असे दोन संघ पाठविता येतील.

६) या स्पर्धेत प्रथम क्रमांकाने यशस्वी झालेल्या स्पर्धकास पुन्हा या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

७) रौप्य करंडक विजेत्या महाविद्यालयास हा करंडक पुढील वर्षी स्पर्धेपूर्वी एक महिना अगोदर मा. प्राचार्य, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर यांचेकडे स्वखर्चाने सुस्थितीत परत करावा लागेल.

८) स्पर्धेसाठी भरावयाच्या प्रवेश अर्जात स्पर्धक विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव, वर्ग, विद्याशाखा, जन्मदिनांक, वय आणि इतर आवश्यक माहिती द्यावी. स्पर्धकांचे वय २५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

९) स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांचे अर्ज त्यांच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत पाठवावेत. तसेच प्रत्येक स्पर्धकाजवळ ओळखपत्र असणे बंधनकारक राहील. स्पर्धकाजवळ महाविद्यालयाचे ओळखपत्र नसल्यास स्पर्धेत भाग घेता येणार नाही. शिवाय प्रवेशिकेबरोबर ओळखपत्राची साक्षांकित झेरॉक्स प्रत जोडणे बंधनकारक राहील.

१०) काही अपरिहार्य कारणामुळे स्पर्धेच्या तारखेत किंवा वेळेत बदल झाल्यास तसे संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना योग्यवेळी कळविण्यात येईल. वैयक्तिकपणे स्पर्धकास कळविले जाणार नाही. या संबंधीची चौकशी स्पर्धकाने आपल्या महाविद्यालयाच्या कार्यालयात करावी.

११) परीक्षकांचा आणि संयोजन समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

१२) प्रत्येक संघास प्रवेश फी रु. १००/- (शंभर) भरावी लागेल.

## ❊ संयोजन समिती ❊

डॉ.एम.यु.पाटील
डॉ.बी.के.वाणी

डॉ.व्ही.ए.खर्डे
प्रा.व्ही.ए.खाडे

डॉ.के.पी.पलघडमल

| | | |
|---|---|---|
| डॉ. शांताराम चौधरी | डॉ. राम पवार | डॉ. प्रदीप दिघे |
| कार्याध्यक्ष | उपप्राचार्य | प्राचार्य |

लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधिने सन्मानित)

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे

# पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, प्रवरानगर.

मु. पो. लोणी खुर्द, ता. राहाता, जि. अ. नगर • फोन (०२४२२) २७३४२५ • फॅक्स २७३४२६

**Website :** www.pravarapvpcollege.org.in • Email : pvpcollege@gmail.com

(नॅक पुनर्मूल्यांकित A ग्रेड (CGPA 3.61), उत्कृष्ट क्षमताशील, आय.एस.ओ. ९००१:२००८
मानांकित, सर्वोत्कृष्ट महाविद्यालय व तारांकित दर्जा प्राप्त महाविद्यालय)

द्वारा आयोजित

## सहकार महर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन

## रौप्य करंडक वादविवाद स्पर्धा
## सन २०२३-२४ (वर्ष ४२ वे)

## • स्पर्धा प्रवेशिका •

जा.क्र.

प्रति,

मा. प्राचार्य,

**पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर**

**स्पर्धेचा विषय : G 20 च्या अध्यक्षपदामुळे देशाची जागतिक महासत्तेकडे वाटचाल सुरु झाली !**

महोदय,

आमच्या महाविद्यालयाच्या वतीने वादविवाद स्पर्धेसाठी कनिष्ठ व वरिष्ठ विभाग दोन/एक संघ पाठवित आहोत.

### • वरिष्ठ विभाग •

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | जन्मतारीख | वर्ग | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |

### • कनिष्ठ विभाग •

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | जन्मतारीख | वर्ग | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |

विद्यार्थ्यासमवेत स्पर्धा शुल्क पाठवित आहोत. आमच्या दोन्ही संघाचा प्रवेश निश्चित करावा.

**संघासमवेत येणाऱ्या शिक्षकाचे नांव :** ______________________

**भ्रमणध्वनी :** ______________________

महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ______________________

______________________

महाविद्यालयाचा दूरध्वनी क्र.: ____________

आपला विश्वासू

**प्राचार्य**

सही व शिक्का

• या स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाने **'सहकार महर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील रौप्य करंडक'** जिंकल्यास तो पुढील वर्षी स्पर्धा सुरु होण्यापूर्वी एक महिना अगोदर आम्ही आमच्या स्वखर्चाने सुस्थितीत आपल्या महाविद्यालयाकडे सुपूर्त करु.